# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

### २६) जिल्हा: नंदुरबार हवामान आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८ जून २०२४

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०६/२०२४ ते २७/०६/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (२९/०६/२०२४ ते ०३/०७/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | दिनांक | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ |
| १२ | ० | ७३ | २५ | ० | ३३ | ० | पाऊस (मिमी) | १८ | १२ | १७ | २५ | १८ |
| ३७ | ३८.२ | ३१.९ | ३४ | ३०.५ | ३४.४ | २९.० | कमाल तापमान (अं.से.) | ३५ | ३४ | ३३ | ३१ | ३१ |
| २९.१ | २९.१ | २५.८ | २६.५ | २८.१ | २७.३ | २८.४ | किमान तापमान (अं.से.) | २५ | २५ | २५ | २४ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| ८५ | ८१ | १०० | १०० | ९२ | ९८ | ९४ | स. सापेक्ष आर्द्रता (%) | ८२ | ८४ | ८५ | ८४ | ८५ |
| ४३ | ३५ | ६९ | ६० | ८४ | ६२ | ८६ | दु. सापेक्ष आर्द्रता (%) | ६४ | ६५ | ७१ | ७९ | ७८ |
| १६ | १९ | १४ | ८ | ९ | ८ | ६ | हवेचा वेग (किमी/तास) | २० | २२ | २५ | २७ | २६ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषी विषयक सल्ला |
|---|---|---|
| पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज सारांश | | भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३१ ते ३५ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २४ ते २५ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता आहे. |
| पुढील आठवड्याचा विस्तारित श्रेणी हवामान अंदाज | | दि. ०३ ते ९ जुलै २०२४ दरम्यान मध्य महाराष्ट्रात पाऊस सरासरीऐवढा पडण्याची शक्यता आहे तसेच कमाल व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे . |
| ➢ हवामान अंदाज आणि कृषी सल्ला पाहण्यासाठी "मेघदुत" मोबाईल ॲपचा वापर करावा. | | |
| सामान्य सल्ला | | नंदुरबार जिल्ह्यातील शहादा, तळोदा, अक्राणी, अक्कलकुवा आणि नंदुरबार तालुक्यात पेरणीयोग्य पाऊस झालेला असून वाफसा आल्यास पेरणी करावी. नवापूर तालुक्यातील पेरणीची घाई करून नये शेतकऱ्यांनी पुरेसा ७५ मिमी पेक्षा जास्त पाऊस झाल्यास पेरणी करावी. हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | पेरणीयोग्य पाऊस झाल्यावर जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन वाफसा आल्यास पिकांची पेरणी करावी. |
| कापूस | पेरणी | कोरडवाहू कापूस: पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्यास वाफसा आल्यास करावी.<br>बीजप्रक्रिया: थायरम बुरशीनाशकाची प्रक्रिया प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम तसेच ॲझोटोबॅक्टर किंवा ॲझोस्पिरीलम जीवाणू संवधर्काची प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम या प्रमाणात प्रक्रिया करावी. |
| सोयाबीन | पेरणी | पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्यास वाफसा आल्यास करावी.<br>बीजप्रक्रिया: बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा चोळावे. तसेच नत्र स्थिरीकरणासाठी रायझोबियम २५० ग्रॅम + स्फुरद विरघळविणारे जीवाणू २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास चोळावे.<br>खत मात्रा: चांगले कुजलेले शेण खत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी १२ ते १५ टन वापरावे तसेच पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, ७५ किलो स्फुरद आणि ४५ किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. |
| मका | पेरणी | पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्यास वाफसा आल्यास करावी.<br>बीजप्रक्रिया : २ ते २.५ ग्रॅम थायरम/किलो तसेच २५ ग्रॅम अँझोटोबँक्टर प्रति किलो बियाण्यास वापरावे.<br>खतमात्रा : पेरणीच्यावेळी ४० किलो नत्र, ६० किलो स्फुरद, ४० किलो पालाश प्रति हेक्टर द्यावे. |
| तूर | पेरणी | पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्यास वाफसा आल्यास करावी.<br>बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास ५ ग्रॅम ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया करावी. यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम जिवाणु संवर्धन १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे. |

# हवामान आधारीत कृषि सल्ला

## जिल्हा कृषि हवामान केंद्र, ग्रामीण कृषि मौसम सेवा,
## डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र,नंदुरबार

दूरध्वनी : ०२५६४ २६०५४४ ईमेल: kvk_ndb@yahoo.com

| | | |
|---|---|---|
| | | खत मात्रा: हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद म्हणजेच १२५ किलो डीएपी पेरणीचे वेळी द्यावे. |
| ज्वारी | पेरणी | पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्यास वाफसा आल्यास करावी.<br>बीजप्रक्रिया: खरीप ज्वारीस १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझोटोबॅक्टर किंवा अँझोस्पिरीलम हे जिवाणूखत चोळावे.<br>खत व्यवस्थापन: पेरणीच्या वेळी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. |
| मूग व उडीद | पेरणी | पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्यास वाफसा आल्यास करावी.<br>बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणूची पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावी.<br>खतमात्रा: १०० किलो डीएपी प्रति हेक्टरी द्यावे. शक्यतो रासायनिक खते ही चांगल्या कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून बियाणालगत द्यावी म्हणजे त्याचा प्रभाव चांगला होतो. |
| ऊस | वाढीची अवस्था | पुर्व मौसमी पाऊस झाल्यावर हुमणीचे भुंगेरे सायंकाळी बाभूळ, कडूनिंब, बोर या झाडांवर जमा होतात. अगोदर मादी भुंगेरे व त्यानंतर नर भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या झाडांवर बसून ते झाडांचा पाला खातात. अश्या झाडांच्या फांद्या रात्री काठीच्या सहाय्याने हलवून खाली पडलेले भुंगेरे गोळा करून रॉकेल मिश्रित पाण्यात टाकून त्यांचा नाश करावा. |
| पशुसंवर्धन | - | झालेल्या पावसामुळे गोठ्याभोवती/गोठ्यात पाणी साचणार नाही, गोठ्यात ओलसरपणा राहणार नाही याची दक्षता घ्यावी. गोठे स्वच्छ व कोरडे ठेवावेत. जनावरांचे खाद्य दमट आर्द्रतायुक्त वातावरणात साठवू नयेत. त्यामध्ये भिंतीचा/जमिनीचा ओलसरपणा मुरणार नाही याची काळजी घ्यावी. |

**स्त्रोत**

**१) हवामान पूर्वानुमान : भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई.**

**२) मागील हवामान : जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार.**

**ठिकाण : कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**

**दि. : २८/०६/२०२४**

**स्वाक्षरीत**

**प्रमुखअन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा-जिल्हा कृषि हवामान केंद्र, कृषि विज्ञान केंद्र, नंदुरबार**